## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ /५७४४/२०२३/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| श्री. तानाजी लालासो खैरे | विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे | गटविकास अधिकारी, पंचायत समिती इंदापूर, जि. पुणे |

**( सुनावणी दिनांक- ०६/०५/२०२५ )**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि. ०६/०९/२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये पुर्ण माहिती देण्यास टाळाटाळ केली, असे नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी विद्यमान जन माहिती अधिकारी हजर आहेत. अपिलार्थी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थी यांनी माहिती अर्जानूसार खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| २६/०४/२०२३ | सन २०१३ ते २०२१ अखेर १४ वा वित्त आयोगाच्या चौकशी अहवालाचा तपशील, अनियमीता अहवालाची प्रत इ. माहिती |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, माहिती देण्यास टाळाटाळ केली.

जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती इंदापूर यांनी अपिलार्थीस जून २०२३ मध्ये तसेच प्रथम अपिलाच्या आदेशाप्रमाणे दि. ०१/०५/२०२५ रोजी माहिती उपलब्ध करुन दिल्याचे आयोगासमोर अवगत केले.

उपलब्ध अभिलेखावरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जून २०२३ मध्ये अंशत: माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येते. तसेच दि. ०१/०५/२०२५ रोजी व आज सुनावणीवेळी समक्ष पुन्हा माहिती उपलब्ध करुन दिली.

अपिलार्थीस माहितीचे प्रदान झाल्याचे दिसून येते. सबब आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>**आदेश**</u>

प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र.रामाआ /५७४४/२०२३/पुणे /7911/2025 दिनांक - 21/5/2025